महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**(महाराष्ट्र शासन उपक्रम)**
**CIN-U40109MH2005SGC1536**
Email :edhrdist@gmail.com
edhr_dist@mahadiscom.in

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन)**
**यांचे कार्यालय**
प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.
दूरध्वनि : २६४७५१२८ विस्तार: २५०८
Website : www.mahadiscom.in

---

**क्र. का.सं. (मा.सं.)/६८४९** **दिनांक :** ०१.०३.२०१६

# प रि प त्र क

**विषय : विनंती बदली संदर्भात**

महावितरणमध्ये HRMS प्रणालीत ज्या कर्मचाऱ्यांना विनंती बदली हवी आहे अशा कर्मचाऱ्यांसाठी ट्रान्सफर मोड्यूलद्वारे विनंती बदलीसंदर्भात अर्ज नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मात्र असे निदर्शनास आले आहे की, काही कर्मचारी बदलीसाठी HRMS मध्ये विनंती अर्ज नोंदवितात आणि तद्नंतर त्यांना बदलीची आवश्यकता वाटत नाही, मात्र ते आपला नोंदविलेला विनंती अर्ज रद्द करीत नाहीत अथवा त्यात बदल करत नाहीत. त्यामुळे HRMS मध्ये विनंती अर्ज प्राप्त आहे असे गृहित धरून प्रशासकीय स्तरावर बदलीची कार्यवाही होते व त्यानंतर असे कर्मचारी आपली विनंतीनुसार झालेली बदली रद्द करावी यासाठी पुन्हा एकदा विनंती करतात. अशी बाब घडू नये, यासाठी सर्व कर्मचाऱ्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी सादर केलेल्या विनंती बदली अर्जावर कार्यवाही होणे अपेक्षित नसल्यास त्यांनी आपला मूळ विनंती अर्ज HRMS मधून रद्द करावा.

प्रशासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, काही कर्मचारी त्यांना बदली हवी असल्यास HRMS मोड्यूलमध्ये विनंती नोंद न करता अथवा विनंती नोंद करून बदलीसाठी हस्ते/परहस्ते राजकीय दबाव आणतात. अशा सर्व कर्मचाऱ्यांचे लक्ष **प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९८, दि. २०.१०.२०१४ नुसार समाविष्ट झालेल्या सेवानियमातील नियम क्र.८५(६)** मधील तरतुदींकडे वेधण्यात येत आहे. या तरतुदीनुसार कर्मचाऱ्यांमार्फत आस्थापनाविषयक बाबींवर हस्ते/परहस्ते राजकीय हस्तक्षेप आणल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते, याबाबतची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**(नीलेश गटणे)**
**कार्यकारी संचालक (मा.सं)**